माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००१२६८**

**अपिलार्थी श्री. इक्बाल आर खान**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(नियोजन)**
वाहतुक विभाग यांचे कार्यालय, वाहतुक पोलीस मुख्यालय,
वरळी, मुंबई -४०० ०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (नियोजन)**
वाहतुक विभाग यांचे कार्यालय, वाहतुक पोलीस मुख्यालय,
वरळी, मुंबई -४०० ०१८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.११.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०९.२०२२ | ०१.१०.२०२२ | ०७.११.२०२२ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २३.१२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०१.१०.२०२२ संलग्न केले आहे.

अर्जदाराने त्यांच्या दिनांक २१.०९.२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये एच/पूर्व विभागातील वांद्रे (पूर्व) कलानगर गृहनिर्माण भवन नानासाहेब धर्माधिकारी मार्ग या ठिकाणी नो पार्किंग रोडवर अशुतोष इंटरप्राईजेस या कंपनीला पे -ॲण्ड पार्किंग चालविण्यासाठी देण्यात आलेल्या परवानगीबाबत माहितीची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.१०.२०२२ च्या पत्रान्वये सदर विषय जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रमुख अभियंता (रस्ता वाहतूक)रस्ता प्राधिकरण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेशी संबंधित असल्याने अपिलार्थींचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) चे तरतुदीनुसार त्यांचे कार्यालयाकडे वर्ग केला व पुढील पाठपुराव्याकरिता संबंधितांशी संपर्क करावा, असे अर्जदारास कळविले.

..२/-

दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी पोलीस उपायुक्त (नियोजन) वाहतुक विभाग यांचे कार्यालयामध्येच प्रथम अपील अर्ज दाखल केला. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत.

माहिती देण्यात आलेली नाही, असे कारण देऊन अपिलार्थी यांनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दिनांक २६.११.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. त्यांनी नमूद केले की, सदर विषय जन माहिती अधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रमुख अभियंता (रस्ता वाहतूक) रस्ता प्राधिकरण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेशी संबंधित असल्याने अपिलार्थी यांचा अर्ज त्यांना माहिती उपलब्ध करुन देणेकरीता वर्ग करुन अपिलार्थीस कळविण्यात आले होते.

अपिलार्थी यांचे म्हणणे आहे की, त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधीत कार्यालयाकडे प्रथम अपील अर्ज सादर केला होता. परंतू, त्यांना त्यांचे प्रथम अपील अर्जावर कोणतेही उत्तर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना योग्य उत्तर दिलेले आहे.

अपिलार्थी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडे केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने त्यांचे समाधान न झाल्यास त्यांनी उचित प्राधिकरणाकडे द्वितीय अपील दाखल करावे. त्यावर स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २७.११.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**